NO. APC -494
Dt. 27-11-2001

जा. क्र. मु. अ/औ. मं/डिबो/बैठक/ 4915 /2000
मुख्याधिकारी यांचे कार्यालय,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. दिनांक: 26/11/2001

प्रति,
कार्यकारी अभियंता. औरंगाबाद विभाग.
मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ
मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ
मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांचे स्वीय सहाय्यक १
~~सहाय्यक~~ वास्तुशास्त्रज्ञ औरंगाबाद मंडळ.
विधी सहाय्यक औरंगाबाद मंडळ.

विषय:- १८-०९-2001 रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर कार्यवाही करणेबाबत.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. १८-०९-2001 रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत यासोबत जोडला आहे. सदर कार्यवृत्तांतावर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल त्वरीत सादर करावा.

सोबत:वरीलप्रमाणे.

मुख्य अधिकारी,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद.करीता

प्रत आस्थापना विभाग .

27-11-01

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

## दि. १८/९/२००१ रोजी दुपारी ३.०० वा. औरंगाबाद मंडळाच्या ११४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

**सदर बैठकीस मंडळाचे खालील पदाधिकारी उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १. मा.श्री. कुंडलिकराव नागरे. | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २. मा.श्री. रामराव शिनगारे. | उपसभापती/औरंगाबाद मंडळ |
| ३. मा.श्री. मकरंद सावे | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ४. मा.डॉ.डी.डी. शिंदे. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ५. मा.श्री. साहेबराव खरात. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ६. मा. ॲड. श्री जे.पी. पाटील. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ७. मा.श्री. बबनराव देशमुख. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ८. मा.श्रीमती. शैलजा दत्तात्रय गायकवाड. | सदस्या/औरंगाबाद मंडळ |
| ९. मा.श्री. संजय वाघचौरे. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| १०. मा.श्री. चाँदपाशा इनामदार. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ११. मा.श्री. राजेश्वर चव्हाण. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| १२. श्री. सिकंदर अली, कार्यकारी अभियंता म.न.पा (मा. आयुक्त म.न.पा. यांचे) | सदस्य प्रतिनिधी |
| १३. श्री. विवेक देशमुख, नगर रचनाकार (मा. उपसंचालक, नगर रचना यांचे) | सदस्य प्रतिनिधी |

मंडळाच्या ११४ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्याचे मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी स्वागत करुन मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

सर्वप्रथम मंडळाने, दि : ११/९/२००१ रोजी अमेरिकेवर दहशतवाद्यानें केलेल्या हल्ल्यात जे निरापराध लोक मृत्यू पडले त्यांना श्रध्दांजली वाहिली.

बैठकीच्या सुरूवातीस मा. सभापती / औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, लोक आवास योजनेच्या कामा बाबत व ग्रामीण भागात गृहनिर्माण योजना राबविण्यास्तव मंडळाच्या अधिकाऱ्यांनी जोमाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच म.न.पा. / न.प. चे अधिकारी व पदाधिकारी यांचे सहकार्य घ्यावे तसेच जिल्हाधिकारी यांचेही सहकार्य घेऊन योजनांच्या कामास गती देणे अत्यंत आवश्यक आहे असेही मा. सभापती यांनी सांगीतले.

मा. सभापती यांनी असेही प्रतिपादन केले की, लातूर , परभणी, उद्‌गीर या ठिकाणी लोक आवास योजनेअंतर्गत कामे सुरू झाली आहेत परंतु बाकीच्या ठिकाणी अद्यापही कामांची सुरूवात झालेली नाही व याबाबीची संबंधीत जिल्हागृहनिर्माण अधिकारी. उप-अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी नोंद घ्यावी व

मंडळाच्या पुढील बैठकीपर्यंत उपरोक्त योजनांअंतर्गत कामाचा वेग वाढवावा असे आदेश मा. सभापती यांनी दिले. या योजनांच्या कामाविषयी कांही अडचणी असल्यास त्या मा. सभापतींच्या नजरेस आणून द्याव्यात जेणेकरून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. व त्या अडचणी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेपर्यंत नेवुन देखिल त्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जाईल, औरंगाबाद शहरातील लोक आवास योजनेतील कामे सुरू करण्याच्या दृष्टीने म.न.पा. औरंगाबादचे महापौर व आयुक्त व मु.अ./औरंगाबाद मंडळ यांचे समवेत बैठक ठेवण्याचे मा. सभापती / औरंगाबाद मंडळ, यांनी निर्देश दिले.

नंतर पटलावरील विषयावर चर्चा करण्यास मंडळाने सुरू केली.

**<u>विषय क्र. १ :- दि: १६/८/०१ व दिनांक २४/०८/२००१ रोजी झालेल्या ११३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे बाबत.</u>**

मंडळाच्या ११३ व्या बैठकीच्या कार्यवृतांतावर मंडळाने सविस्तर चर्चा केली. गृहनिर्माण भवनाजवळील शहर भूमापन क्र. २०७१९ गृहनिर्माण भवन (औरंगाबाद) येथिल भूखंडाच्या वितरणा बाबत निविदा मागवून विक्रीसाठी ठराव क्र. ६८६ सम्मत केला तसेच स.न. ७ मुकूंदवाडी (औरंगाबाद) येथिल भूखंडावर बांधावयाच्या इमारतीचे डिझाईन (मॉडेल्स) जागतीक / राष्ट्रीय स्तरावरील वास्तुशास्त्रज्ञाकडून मागविण्यासाठी. ठराव क्र. ६८७ सम्मत केला आहे. या दोन्हीही ठरावा बाबत मा. श्री. शिंदे यांनी मत व्यक्त केले की, या दोन्हीही भूखंडावर म्हाडानेच योजना राबवावी. यावर मा. मु. अ. / औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, ठराव क्र. ६८६ व ६८७ प्रमाणे कार्यवाही करण्यास मंडळाने ठराव पारीत केले आहेत व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास, हरकत नाही. तथापि, सदर दोन्हीही ठरावानुसार डिझाईन मागिल्यानंतर त्यावर मंडळाने प्राप्त डिझाईनमधून अंतिम निर्णय घेतल्यावर कोणत्या पध्दतीने बांधकाम करावयाचे हे ठरविण्यात येईल. व त्या प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

परंतू तुर्त तरी वरिल दोन्हीही ठरावा प्रमाणे, स्पर्धात्मक डिझाईन (ठराव क्र. ६८६ व ६८७) नुसार कारवाई करण्यांत यावी असे मा. मु. अ. / औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत नमुद केले व त्यास मंडळाने मान्यता दिली व वरिल चर्चा झाल्यानंतर मंडळाने ११३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याबाबत ठराव केला.

<u>ठराव क्र. ६९० :</u>

मंडळाच्या दि: १६/८/२००१ रोजी व दि: २४/८/२००१ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला असा निर्णय मंडळाने एकमताने घेतला.

**<u>विषय क्र : २ (अ) :</u> राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत स.क्र. १४५ (भाग) देवळाई, औरंगाबाद येथे अत्यल्प उत्पन्न गटाअंतर्गत २०० गाळे बांधणे या निविदेवर निर्णय घेणे बाबत.**

**<u>आणि</u>**

**<u>विषय क्र. २ (ब) :</u> राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत स. क्र. १४५ (भाग) देवळाई, औरंगाबाद येथे अल्प उत्पन्न गटासाठी २०० गाळे बांधणे. निविदेवर निर्णय घेणे बाबत.**

या विषयांची बाब टिप्पणी मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. येरावार यांनी मंडळास वाचुन दाखविली या बाबत मंडळाचे सदस्य श्री. सावे यांनी मुद्दा उपस्थित केला की, विषय क्र. २ (अ) मधील २०० गाळे अत्यल्प उत्पन्न गटाची मे. एलोरा कन्सट्रकशन्स कंपनी यांची निविदा ही, निविदा- किमतीपेक्षा १४.११% कमी दराने प्राप्त आहे व विषय क्र. २ (ब) मधील २०० गाळे अल्प उत्पन्न गटाची मे. एलोरा कन्सट्रकशन्स कंपनी यांची निविदा ही निविदा किंमतीपेक्षा २.२५% कमी दराने प्राप्त आहे व इतक्या कमी दराच्या निविदांमध्ये कंत्राटदाराकडून चांगल्या प्रतिचे काम होईल काय ? याबाबत शंका वाटते. मा. सभापती, यांनी सांगितले की. निविदा अत्यंत कमी दरांच्या असल्यामुळे बांधकामाचा दर्जा व गुणवत्तेचा विचार करता त्या विचारात घेण्यांत येवू नये. श्री. सिकंदर अली, कार्यकारी अभियंता, म. न.पा. तथा मा. आयुक्त, म.न.पा.चे प्रतिनिधी यांनी असे मत व्यक्त केले की, कंत्राटदाराची एवढ्या कमी दरात काम करण्याची तयारी असेल तर, कंत्राटदाराने यापूर्वी केलेल्या कामाचा अहवाल द्यावा व त्यांचेकडून कामाचा दर्जा अत्युत्तम राखला जाईल या बाबतचे लेखी हमीपत्र घ्यावे. मंडळाचे सदस्य मा. श्री. इनामदार यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, एवढ्या कमी दरात कंत्राटदार चांगल्या दर्जाचे काम करू शकेल काय ? व कमी दराबाबतचे कंत्राटदाराकडून रेट-ॲनलेसीस घेण्यात यावे मा. श्री. इनामदार यांनी असेही मत व्यक्त केले की, दोन्हीही कामाची साईट एकच आहे, लागणारी मशीनरीही एकच असणार व साईटवरचा स्टॉफही एकच असणार तरी देखील दोन्हीही कामाच्या निविदेतील दरामध्ये कमालीची भिन्नता का आहे, करिता मंडळाने कंत्राटदारास वाटाघाटासाठी बोलवावे व नंतरच दोन्हीही कामाच्या निविदेवर मंडळाने निर्णय घ्यावा. मंडळाचे सदस्य श्री. सावे, यांनी असे प्रतिपादन केले की, १४.११% कमी दराची निविदा (विषय क्र. २ (अ) मधील कामाची निविदा) मंजूर करण्यास हरकत नाही, परंतु योजनेतील गाळ्यांच्या कामाची गुणवत्ता व दर्जा वेळोवेळी मंडळाच्या एका समितीने तपासावा व चांगल्या प्रतिच्या कामा बाबत खात्री करून घ्यावी.

वरिल प्रमाणे, चर्चा झाल्यानंतर मु. अ. / औरंगाबाद मंडळ यांन सांगीतले की, विषय क्र. २ (अ) व २ (ब) मधील दोन्हीही गृह निर्माण योजना साठी ठोस मागणी अजमाविण्यांत आली आहे व त्यासाठी मंडळाकडे लाभधारकांच्या अनामत रक्कमाही जमा आहेत, करिता ह्या दोन्हीही कामांच्या निविदांवर लवकरात लवकर निर्णय घ्यावा जेणेकरून कामाची सुरूवात लवकर होईल. मु. अ. यांनी असेही प्रतिपादन केले की, मा. मुख्य अभियंता / म्हाडा, मुंबई यांनीही कळविले आहे की, मंडळाने कंत्राटदारास वाटाघाटीसाठी बोलवावे व निविदेवर मंडळाने निर्णय घ्यावा. याविषयी मंडळाने सविस्तर चर्चा करून, चर्चेअंती ठरविले की, या दोन्हीही निविदावर निर्णय घेण्यासाठी सदस्यांची एक उपसमिती नियुक्त करावी. या समितीत सदस्य श्री सावे, श्री. शिंदे श्री. चव्हाण, श्री. पाटील व श्री वाघचौरे हे सदस्य राहतील असे ठरले. या उपसमितीने कंत्राटदाराशी वाटाघाटी करून निविदाविषयी निर्णय घेवुन तो मा. सभापती व मा. मु. अ. यांना कळवावा असे बैठकीत ठरल्यानंतर, वरिल उपसमितीच्या सदस्यांनी कंत्राटदाराशी वाटाघाटीकरून बैठकिच्याच दिवशी शेवटी त्यांनी असा निर्णय कळविला की. दोन्हीही कामाच्या न्युनतम कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यांत यावी व सदर कंत्राटदारास म्हाडाच्या पत्र क्र. ११७६ दि. १६-६-०१ व पत्र क्र. ११७५ दि. १६-६-०१ प्रमाणे कामे देण्यास हरकत नाही. वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर व उपसमितीने बैठकीत नमुद केलेल्या त्यांचे निर्णयानुसार मंडळाने खालील प्रमाणे ठराव पारीत केला.

## ठराव क्र : ६९१

राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत स. क्र. १४५ (भाग) देवळाई, औरंगाबाद येथिल अत्यल्प उत्पन्न गटाअंतर्गत २०० गाळे बांधणे व अल्प उत्पन्न गटाअंतर्गत २०० गाळे बांधणे या दोन्हीही कामांच्या निविदाबाबत. मंडळाच्या सदस्यांच्या उप समितीने - सदर दोन्हीही निविदां स्विकारण्यात याव्यात व तसेच मुख्य अभियंता / प्रा., यांनी त्यांचे पत्र क्र. ११७६ दि. १६ / ६/०१ व पत्र क्र. ११७५ दि. १६/६/२००१ नुसार दिलेल्या मान्यतेनुसार, मे. एलोरा कन्सट्रकशन्स कंपनी यांना कामे देण्यास हरकत नाही असा निर्णय मंडळास कळविल्यानुसार, विषय क्र. २ (अ) व २ (ब) मधील निविदा स्विकृत करण्याचा निर्णय मंडळाने एकमताने घेतला व सदर दोन्हीही कामाच्या न्यूनत्तम कंत्राटदारास (मे. एलोरा कन्सट्रकशन्स कंपनी) कामे देण्यास हरकत नाही असाही मंडळाने एकमताने निर्णय घेतला.

## राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम २००१-०२ बाबत

राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत मंडळाच्या ११३ व्या बैठकीत ठरल्याप्रमाणे १९९१ च्या लोकसंख्येवर आधारीत प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता पारीत करण्याचे मंडळाने (ठराव क्र. ६८५ नुसार) सम्मत केले आहे. त्यानुसार मा. मु. अ. / औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास अशी माहीती दिली की, औरंगाबाद मंडळान्तर्गत दोन महानगरपालिका व नऊ नगरपालिकांचा समावेश आहे. व राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांन्तर्गत शासनाच्या १/१०/९८ च्या परिपत्रका नुसार सामाजिक सुविधा पुरविण्या बाबत असणाऱ्या निकष व तरतुदीची माहीती दिली. मनपा/नपा त्यांचे कडून प्रशासकीय मान्यता प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यांचे छाननी आणि प्रशासकीय मान्यतेचे पात्र रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| क्र. | शहराचे नांव | प्रशासकीय मान्यता पात्र रक्कम | |
|---|---|---|---|
| | | भौतीक सुविधा | सामाजीक सुविधा |
| १) | औरंगाबाद | (सन. २०००-०१ मध्ये ४२.३६ लक्ष च्या कामानां प्र.मा.प्रदान) | |
| २) | जालना | ७०.९८ | --- |
| ३) | बीड | १३०.५५ | १२४.६६ |
| ४) | अंबाजोगाई | --- | २२.१७ |
| ५) | परळी वैजनाथ | २३.५० | --- |
| ६) | लातूर | १९९.७१ | २६०.०० |
| ७) | उदगीर | २७.८० | |
| ८) | नांदेड | ५०.०० | --- |
| ९) | परभणी | ११२.७९ | १२४.८० |
| १०) | हिंगोली | ३८.६५ | --- |
| ११) | उस्मानाबाद | २२.४९ | --- |
| | एकुण | ६७६.४७ लक्ष | ५३१.६३ लक्ष |

उक्त प्रमाणे मा. मु., अ. / औरंगाबाद मंडळ यांनी दिलेल्या माहितीस मंडळाने मंजुरी दिली.

## विषय क्र: ३ : मा. सभापती / औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने येणारे आयंत्या वेळेचे विषय :

### ठराव क्र : ६९२

बैठकीत वरील प्रमाणे चर्चा व ठराव घेतल्यानंतर, मा. मु. अ. / औरंगाबाद यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, महाराष्ट्र शासनाने ग्रामीण निवारा योजनेंचा ड्राफ्ट शासन निर्णय म्हाडा, मुंबई कार्यालयात प्राप्त झाला आहे व शासन अंतीम निर्णय लवकरच घेणार आहे. शासनाने ग्रामिण भागात ग्रामीन निवास योजना राबवुन घरे बांधण्याचा संकल्प केला असुन सदर योजना मूर्त स्वरूपात येण्यासाठी शासनाकडे वेळोवेळी मंडळाचे सभापती मा.. आ. श्री. नागरे साहेब यांनी पाठपुरावा केला व पत्रव्यवहार करून सदर योजनेस मंजुरी मिळविण्यासाठी अथक परिश्रम घेतले, त्यामुळे मु. अ. व मंडळाचे सर्व सदस्यांनी मा. सभापती श्री नागरे साहेब यांचे हार्दिक अभिनंदन केले. तसेच सदर योजने बाबत पाठपुरावा करून योजना मार्गी लावल्या बद्दल मंडळाच्या सर्व सदस्यांनी व मा. सभापती यांनी मुख्य अधिकारी श्री. शिनगारे यांचेही अभिनंदन केले. तसेच सदर ग्रामिण निवास योजनेस शासनाने मंजुरी दिल्या बाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. विलासरावजी देशमुख साहेब यांचेही हार्दिक अभिनंदन मा. सभापती व मंडळाच्या सर्व सदस्यांनी केले. मा. सभापती यांनी बैठकीत नमुद केले की, ग्रामीण भागात घरे बांधण्याच्या योजनेस कर्ज उपलब्ध करून घेण्यासाठी शासनाने हमी द्यावी कारण शासनाने कर्ज उपलब्ध करून घेण्यासाठी हमी दिल्यासच ही योजना प्रत्यक्षात मार्गी लागेल. वैयक्तिक कर्ज मिळत नाहीत, म्हणून शासनाने हमी द्यावी म्हणून मंडळामार्फत शासनाकडे / म्हाडाकडे प्रस्ताव पाठवावा अशा सभापती यांनी बैठकीत सूचना दिल्या.

मा. श्री. इनामदार, सदस्य, यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, गुमास्ता सहकारी संस्थेच्या सदस्यांसाठी लातुर येथे जी घरांची योजना मंडळाने राबविली त्या गृहनिर्माण योजने जवळील रोडवर एक म्हाडाच्या. (औरंगाबाद मंडळाचा) नावाची एक कमान करण्यात यावी जेणेकरून मंडळाच्या योजनांबाबतची माहीती व प्रसिध्दी जनमानसात होईल. या विषयी, मा. सभापती व मंडळाचे सर्व सदस्य यांनी मा. श्री. इनामदार यांनी नमुद केलेल्या कमानीच्या उभारणीच्या कामासाठी मंजुरी देणेसाठी सहमती दर्शविली व हे काम लवकरात लवकर होणेसाठी मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनीही सूचना दिल्या व या बाबत मंडळाने निर्णय घेतला की,

### ठराव क्र : ६९३

लातुर येथील गुमास्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदाकरिता जी गृहनिर्माण योजना मंडळाने राबविली आहे. त्या योजने लगतच्या मुख्य रस्त्यावर एक म्हाडाच्या नावाची कमान उभारण्यास मंजुरी देण्यात आहे व त्याप्रमाणे कमान उभारण्याची कार्यवाही त्वरीत करावी जेणेकरून मंडळाच्या योजनेची माहीती जनमानसात होईल.

१) मा. श्री. साहेबराव खरात, सदस्य, यांनी बैठकीत नमुद केले की, ''अंबड येथे गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी अंबड येथील खाजगी जमीन स. न.१७० ह्या जमिनीची पहाणी मा. मु. अ./ औरंगाबाद मंडळ यांनी संबंधीत उपअभियंता यांचे सोबत केली व सदर जमिनीवर अत्यल्प गटाची योजना राबविण्यास जमीन योग्य आहे. म्हणून सदर जमिन घेऊन त्यावर अत्यल्प उत्पन्न गटाची योजना राबविण्याचा विचार होता असेही श्री खरात यांनी प्रतिपादन केले. मा. सभापती व मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी श्री. खरात यांच्या मताशी सहमती दर्शविली. तसेच मुख्य अधिकारी यांनी सांगितले

की, प्रथम योजनेसाठी ठोस मागणी प्राप्त झाल्यास व जमिन आरक्षण विरहीत असल्यास, सदरची जमिन म्हाड कायद्यान्वये संपादित करणे बाबत कार्यवाही करण्यात येईल.

२) मा. श्री. साहेबराव खरात यांनी बैठकीत प्रतिपादन केले की,

जालना येथिल बिडी कामगार योजनेतील गाळ्याचे दरवाजे, खिडक्याच्या चौकटी व पाईप्स गायब झाले आहेत. त्याची चौकशी करण्यात यावी व एकूण असे किती रूपयाचे नुकसान झाले आहे याचा अहवाल घेऊन त्याची जबाबदारी मंडळाचे संबंधीत अधिकाऱ्यांवर निश्चित कराची व झालेल्या नुकसानीची रक्कम मंडळाच्या संबंधीत जाबादार असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून वसुल करण्याची कार्यवाही मंडळाने करावी, त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळास सादर करावा. कार्यकारी अभियंता यांनी पुढील बैठकीच्या पूर्वी चौकशी अहवाल सादर करण्याची सुचना मु. अ. यांनी दिली.

३) मा. श्री. वाघचौरे, सदस्य यांनी मुद्दा उपस्थित केला की, औरंगाबाद मंडळा अंतर्गत मंडळाच्या जमिनीवर / जागेवर जी अतिक्रमणे झाली आहेत, त्यांची सविस्तर महिती मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना द्यावी व मंडळा समोर माहीती सादर करावी जेणेकरून मंडळाचे मा. सभापती व सर्व सदस्य यांना त्यांची महिती होईल. मा. श्री. वाघचौरे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याशी मा. सभापती व सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दिली व अतिक्रमणा बाबची माहीती मि. व्य/औरंगाबाद यांनी माहिती द्यावी, अशा सूचना दिल्या.

४) औरंगाबाद मंडळाअंतर्गत संपादीत केलेल्या जमिनीची माहीती, ज्या गृ. नि. योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली अशा योजनाची महिती मंडळाच्या सर्व सदस्यांना द्यावी तसेच सदर महिती मंडळापुढे सादर करावी. अशा सूचना देण्यात आल्या.

५) मा. श्री. इनामदार, सदस्य यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, औरंगाबाद मंडळास लातुर येथे भविष्यात गृ. नि. यो. राबविण्यासाठी जमीनीची आवश्यकता आहे व त्यादृष्टीने लातूर येथे मंडळाने खाजगी / शासकीय / निमशासकीय जमीनी घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. करिता मंडळाने लातुर येथे एम. आय. डी. सी. कडून ५० एकर जमिनी घेण्याचा प्रस्ताव पाठविणे, लातुर येथेच बार्शी रोड ते अंबेजोगाई रींग रोड लगत ५० एकर खाजगी जमीन, अंबेजोगाई ते नांदेड रिंग रोड लगत ५० एकर खाजगी जमीन, बार्शी रोड ते औसा रोड लगत ५० एकर खाजगी जमीन व औसा रोड ते नांदेड रोड लगत ५० एकर खाजगी जमीन घेण्याचे / संपादनाचे प्रस्ताव तयार करून त्याप्रमाणे प्रस्ताव संबंधीत कार्यालयाकडे / अधिकाऱ्याकडे मंडळाच्या अधिकाऱ्याने पाठवावेत असाही प्रस्ताव मा. श्री. इनामदार यांनी बैठकीत नमुद केला. या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळाच्या संबंधीत अधिकाऱ्याने मंडळाच्या बैठकीत सादर करावा अशा सूचना मा. सभापती यांनी बैठकीत दिल्या व या संबंधी मंडळाने निर्णय घेतला की,

प्रथमता लातुर येथे एम. आय.डी.सी. कडून ५० एकर जमीनीचा मागणी प्रस्ताव एम.आय.डी.सी. लातूरयांचे कडे पाठवावा असे ठरले त्या प्रमाणे कार्यकारी अभियंता / लातूर यांना पूढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर आवशयकता भासल्यास व ठोस मागणी प्राप्त झाल्यास खाजगी जमीनीचा प्रस्तावाचा विचार करता येईल.

६) मा. श्री शिंदे सदस्य यांनी बैठकीत मुद्दा उपस्थित केला की, मंडळाच्या विविध गृहनिर्माण योजनांत / भूखंड योजनात जे विविध प्रवर्गासाठी आरक्षण ठेवले आहे, त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी, धरणग्रस्तांसाठी व भूकंपग्रस्तांसाठी सध्या आरक्षित गाळे / भूखंडाचे आरक्षण नाही, परिणामी ह्या तिन्ही प्रवर्गातील जनता गाळे / भूखंड आरक्षीत कोट्यातून घेवु शकत नाहीत, त्यामुळे ह्या प्रवर्गासाठी देखील आरक्षण ठेवण्याचा प्रस्ताव शासनास / प्राधिकरणास पाठवावा. मा. सभापती व मंडळाच्या सर्व सदस्यांनी मा. श्री. शिंदे यांचे सदर

मुद्द्याबाबत सहमती दर्शविली व धरणग्रस्तांसाठी प्रकल्पग्रस्तांसाठी व भूकंपग्रस्तांसाठी मंडळाच्या योजनेतील गाळे / भूखंडासाठी आरक्षण ठेवण्यासाठीचा रितंसर प्रस्ताव शासनाकडे / प्राधिकरणाकडे पाठविणे बाबतचा निर्णय मंडळाने घेतला त्यावर मु. अ. यांनी सांगितले की शासनाचे विहीत आरक्षण घर बांधणीसाठीही लागू आहे. त्यामध्ये वरील प्रमाणे तपासणी मिळकत व्यवस्थापक औ. म. यांनी करावी वरील आरक्षणे नसतील तर तसा प्रस्ताव पाठवावा असे ठरले.

७) मा. श्री. शिंदे, सद्स्यय यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, गृहनिर्माण भवनाजवळील शहर भूमापन क्र. २०७१९ वर, आता मंडळ जी योजना / व्यापारी संकुल बांधेल, त्यावेळी सदर भूखंडालगत ज्या दोन व्यापारी इमारती बऱ्याच वर्षा पुर्वी बांधल्या आहेत त्या पाहून तेथील विद्यमान दुकानदारांना मंडळाच्या प्रस्तावित व्यापारी संकुलात एक.एक दुकान मोफत देवु शकता येईल काय ? व त्यांची या बाबत सम्मती घेणे बाबत त्यांचेशी चर्चा करून त्यांचा काय प्रस्ताव राहील किंवा सदर इमारती पाडण्यांस व त्यांना नविन दुकान देण्यास त्यांची सम्मती आहे काय ? याबाबत दुकानदारांना विचारणा करण्यासाठी व असे झाले तर सदर भूखंडावर भव्य अशी गृहनिर्माण योजना व्यापारी संकुल मंडळामार्फत कार्यान्वीत करता येईल असा प्रस्ताव मा. श्री. शिंदे यांनी बैठकीत नमुद केला. मा. सभापती व मंडळाच्या सर्व सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, गृहनिर्माण भवनाजवळील ज्या दोन इमारती आहेत त्या पाडून त्याखालील जागाही प्रस्तावीत व्यापारी संकुलासाठी / गृहनिर्मान योजनेसाठी वापरात येवून योजनेचे स्वरूप व जास्तीचे आकर्षक होण्यास मदत होईल व त्यायोगे मंडळासही भरपुर फायदा होईल. असेही मा. श्री. शिंदे यांनी मत व्यक्त केले. म्हणून सदर मुखंडालगत असलेल्या दोनही इमारतीमधील दुकानदारांशी मंडळाच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी संपर्क साधुन त्यांना प्रस्तुत प्रस्तावाबाबत कल्पना द्यावी व त्यांची सम्मती घेण्यासाठी व चर्चा करण्यांसाठी त्यांना मंडळाच्या पुढील बैठकीच्या दिवशी मंडळासमोर त्यांना बोलवावे म्हणून मा. श्री. शिंदे, सदस्य, यांनी प्रतिपादन केले. मा. श्री. शिंदे, मिळकत व्यवस्थापक यांच्या वरिल मुद्याशी मा. सभापती व मंडळाचे सर्व सदस्य यांनी सहमती दर्शवीली व मा. श्री. शिंदे व मिळकत व्यवस्थापक यांनी प्रथम संबधिताशी चर्चा करावी प्रारूप प्रस्ताव व मंडळासमोर विचार विनिमयासाठी तयार करावा असे ठरले.

वरिल प्रमाणे पटलावरील विषय संपल्यावर व वरिल प्रमाणे चर्चा व ठराव सम्मंत झाल्यानंतर, मा. सभापती यांचे परवानगीने उपस्थिताचे आभार मानुन राष्ट्रगितानंतर बैठक समाप्त झाली.